महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153648)
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी ०२२-२४०७७४४१/४२/४३ website: www.mahagenco.in Email ID- srmanagerhrclaims@mahagenco.in

क्र.महानिर्मिती/व.व्य.(मासं-देयके)/ No.12223 दिनांक: 19 OCT 2018

# परिपत्रक

**विषय:** भविष्य निर्वाह निधी अग्रीम उचल, अंतिम प्रदान व निवृत्ती वेतनाच्या प्रकरणांबाबत.

**संदर्भ:** सचिव, विश्वस्त मंडळ (भनिनि), म.रा.वि.मंडळ यांचे पत्र क्र. लेवि/भनिनि/५८४ दि. १२.०९.२०१८.

--------

असे निदर्शनास आले आहे की, अधिकारी/कर्मचारी यांची भविष्य निर्वाह निधी अग्रीम, अंतिम प्रदान व निवृत्तीं वेतनाची प्रकरणे म.रा.वि.मंडळ, भनिनि कार्यालयास पाठवताना बऱ्याच वेळा खालील प्रकारच्या त्रृटी आढळून येत आहेत. करीता क्षेत्रिय कार्यालयाने अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव पाठवताना खालील दक्षता बाळगून म.रा.वि.मंडळ, भनिनि कार्यालयास प्रस्ताव पाठवावे.

1. क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे भनिनि अग्रीम, अंतिम प्रदान व निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव पाठविताना भनिनि विभागाच्या चेकलिस्ट (आवश्यक असलेली कागदपत्रे) नुसार परिपूर्ण सादर करीत नसल्यामुळे, सदर प्रस्ताव वारंवार त्रृटी पूर्ततेसाठी विभागीय कार्यालयास परत पाठवावे लागतात. सदर प्रस्ताव म.रा.वि.मंडळ, भनिनि कार्यालयास सादर करतेवेळी प्रस्ताव परिपूर्ण असल्याची खातरजमा संबंधित क्षेत्रिय कार्यालयाने करावी.

2. क्षेत्रिय कार्यालयातील भनिनि अनुसूचीचे माहे ऑगस्ट २०१८ पासून प्रलंबित असलेले प्रमाणिकरण लवकरात लवकर सादर करण्यात यावे.

3. MSEB CPF पोर्टलवर परतफेडसाठी वापरावयाचे सुत्र व व्याजाचे दर नमुद केलेला आहे. सदर सुत्रानुसारच गणना करुन व (१% BOT) चे हप्ते कपात करण्यात यावेत, जेणेकरुन कर्मचाऱ्यांची भनिनि अग्रीम उचल व अंतिम प्रदान प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत.

4. कर्मचारी निवृत्ती वेतनासोबत १२ महिन्यांचा तक्ता व अनुसुची यामध्ये तफावत राहणार नाही याची खातरजमा क्षेत्रिय कार्यालय स्तरावर करण्यात यावी.

5. मृत कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एखादा कर्मचारी महिन्याच्या कोणत्याही तारखेस मृत्यू पावला तर त्या कर्मचाऱ्यांचे त्या तारखेपर्यंत वेतन काढण्यात यावा व त्याअनुषंगानेच एस् फॉर्म व अनुसूची भनिनि कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात यावी.

6. क्षेत्रिय भनिनि आयुक्त, बांद्रा, मुंबई यांच्या सुचनेप्रमाणे व MSEB CPF Trust चे परिपत्रक क्र. २०५ दि. २६.०५.२०१७ अन्वये मृत कर्मचाऱ्यांच्या वारसाचे निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव ई.डी.एल.आय.सी. च्या परिपूर्ण प्रस्तावासोबतच पाठविण्यात यावेत.

7. पूरक देयकांबाबतीत रद्द केलेला धनादेश तसेच संबंधित प्रकरणे लेखापरिक्षित करुनच भनिनि कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात यावीत.

क्षेत्रिय भनिनि आयुक्त, बांद्रा, मुंबई यांच्यामार्फत देण्यात आलेल्या वरील सुचनांची अंमलबजावणी करुन त्रृटी विना प्रस्ताव मुख्य कार्यालयास पाठविण्याची जबाबदारी सर्व क्षेत्रिय कार्यालयाची राहिल. असेही निदर्शनास आले आहे की, म.रा.वि.मंडळ, भ.नि.नि. कार्यालय ज्या त्रृटींसाठी अर्ज नामंजुर/ त्रृटींकरीता परत पाठवतात ती सर्व कारणे क्षेत्रिय कार्यालयाशीच संबंधित असतात. सबब क्षेत्रिय कार्यालयाने त्रृटीचे कारण Online पाहून संबंधित त्रृटींची पूर्तता तात्काळ करावी.

या परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करुन तसेच त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**सोबत:** वरिलप्रमाणे

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रति,**

१) मुख्य अभियंता, महानिर्मिती, महा औ.वि.केंद्र, चंद्रपूर/ कोराडी/खापरखेडा/ भुसावळ/ परळी/ नाशिक/ पारस/वायु विद्युत केंद्र उरण/स्थापत्य-४, भुसावळ/ खापरखेडा प्रकल्प/कोराडी प्रकल्प/ स्थापत्य बांधकाम मंडळ, कोराडी/ प्रशिक्षण केंद्र, कोराडी/ निर्मिती बांधकाम विभाग, कोराडी.

२) मुख्य महाव्यवस्थापक (मासं-प्रशिक्षण), महानिर्मिती, नाशिक प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

३) उप मुख्य अभियंता, महानिर्मिती, जल विद्युत केंद्र, पोफळी/ परळी प्रकल्प/ भुसावळ प्रकल्प/ चंद्रपूर प्रकल्प/ कोल नागपूर.

४) उप मुख्य अभियंता (स्था.), महानिर्मिती, चंद्रपूर/ पारस/ भुसावळ/ परळी/ कोराडी.

५) अधीक्षक अभियंता, महानिर्मिती, नवीकरणीय ऊर्जा मंडळ पुणे/नाशिक.

**प्रत रवाना:**

सचिव, विश्वस्त मंडळ (भनिनि), म.रा.वि.मंडळ, धारावी रोड, माटुंगा (पूर्व), मुंबई-१९.